**दिनांक – २५/०३/२०२६**

**शपथेवर फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास विधीज्ञ श्री. ए.डी. वसेकर यांचेमार्फत सुरु.**

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०७/०३/२०१४ रोजीचा करार मी आजरोजीपर्यंत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०७/०३/२०१४ रोजीचा करार दाखल करण्यास मला वैयक्तिक काही अडचण नव्हती.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक ०१/०४/२०१२ ते ३१/०३/२०१३ पर्यंतचा आरोपीचा कारखान्याकडे असणारा खातेउता-याची छायांकित प्रत दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ पर्यंतचा आरोपीचा कारखान्याकडे असणारा खातेउता-याची छायांकित प्रत दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ पर्यंतचा आरोपीचा कारखान्याकडे असणारा खातेउता-याची छायांकित प्रत दाखल केली आहे.

**१५.** प्रस्तुतचे प्रकरण सन २०१३-१४ सालामध्ये घेतलेल्या करारापोटी दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३-१४ या हंगामासाठी करार करायचा झाल्यास तो सन २०१३ या वर्षातच केला पाहिजे. सन २०१३ साली आरोपीने किती उचल घेतली होती ती निश्चित रक्कम मला सांगता येणार नाही. हे मला आठवत नाही की, सन २०१३ साली आरोपीने किती रुपयांचे काम केले होते. हे मला सांगता येणार नाही की, सन २०१४ साली आरोपीने किती उचल घेतली होती.

**प्रश्न -** सन २०१४ साली आरोपीने किती रुपयांचे काम केले होते हे तुम्हाला सांगता येईल का?
**उत्तर -** आरोपीने अर्धवट काम सोडले होते. किती रक्कमेचे काम केले होते हे मला आठवत नाही.

**१६.** हे मला सांगता येणार नाही की, सन २०१५ साली आरोपीने किती उचल घेतली होती.

**प्रश्न -** सन २०१५ साली आरोपीने किती रुपयांचे काम केले हे तुम्हाला सांगता येईल का?
**उत्तर -** आरोपी अर्धवट काम सोडून गेला होता.

**१७.** मी सन २०१६ पासून कारखान्यात नेमणुक होवून कामास रुजू झालो आहे. सन २०१३ ते २०१५ या कालावधीमध्ये मी शिक्षण घेत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ ते २०१५ या कालावधीमध्ये माझा आणि कारखान्याचा काहीही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ ते २०१५ या कालावधीतील आरोपी संबंधी कोणतीही माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपीला ७,११,३९९/- रुपये दिले होते असा दाखविणारा कागद या प्रकरणात दाखल केला नाही.

**प्रश्न -** स्टोअर मटेरियल वसूलीची रक्कम रु.११,३९७/- चे चलन तुम्ही या प्रकरणात दाखल केले नाही?
**उत्तर -** चलन वगैरे असे काहीच नसते.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, ११,३९७/- ही रक्कम बोगसरित्या आकारली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१५ अखेरपर्यंत आरोपीने फिर्यादी कारखान्याकडून कधीही रक्कम रु.७,११,३९९/- स्वीकारली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रु.७,११,३९९/- ही रक्कम बोगस आकारली असल्यामुळे ती रक्कम आरोपी फिर्यादीला देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील धनादेशामधील नमूद रक्कम रु.४,८७,०८१/- आरोपी फिर्यादीला कधीही देणे लागत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने उत्तरी नोटीस कारखान्याला पाठवलेली होती.

**प्रश्न -** आरोपीने कारखान्याला पैसे देणे लागत नाही अशा मजकूराची उत्तरी नोटीस पाठविली होती.

**उत्तर -** उत्तर नोटीसमधील मजकूर खोटा आहे.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, मी या खटल्याबाबत कारखान्याकडून संपूर्ण माहिती घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने वेळोवेळी काम करुन आमच्या कारखान्याची पूर्ण रक्कमेची परतफेड केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील रक्कमेबाबतचा सर्व मजकूर खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा आमचे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपी कारखान्याला देणे लागत नसल्यामुळे मी या खटल्यामध्ये कारखान्याचा मूळ करार व मूळ खाते उतारा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कारखान्याला काही देणे लागत नाही ही बाब मे. न्यायालयासमोर येईल या भितीपोटी मी खातेउतारा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील हस्ताक्षर व सही आम्ही बोगस केली आहे व खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपी कारखान्याला काही

देणे लागत नसताना आरोपीची आर्थिक पिळवणूक करण्याकरीता प्रस्तुतची खोटी केस दाखल केली आहे.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, पोहोचपावती निशाणी क्र.५९ वर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला नोटीस मिळाली होती असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला नोटीस खोटी रक्कम नमूद करुन चुकीच्या पत्यावर पाठवली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस माझ्या सहीने पाठवलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मूळ फिर्याद माझ्या सहीने दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द वेळोवेळी बोगस कागदपत्रे तयार करुन खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, करारपत्राच्यावेळी तारणापोटी घेतलेल्या को-या धनादेशाचा गैरवापर करुन खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया मजकूराचे शपथपत्र दाखल केले आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.03.25 17:02:44 +0530

दिनांकः २५/०३/२०२६
ठिकाणः आटपाडी.

(आर. बी. कुलकर्णी)
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
आटपाडी